# नांदेडच्या बेपत्ता युवकाला काश्मीरहून आणले परत

## नापास झाल्याने पडला होता घराबाहेर

**नांदेड, ता. १४ :** 'पॉलिटेक्निक'च्या प्रथम वर्षात अनुत्तीर्ण झाल्याने घराबाहेर पडून जम्मू काश्मीरमध्ये गेलेल्या युवकास नांदेडच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकाने परत आणले आहे. त्याला त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

मन्मथ गंगाधर कनगिरे (रा. गणपूर कामठा, ता. अर्धापूर, जि. नांदेड) यांनी सतरावर्षीय पुतण्या हरवला असल्याची तक्रार भाग्यनगर पोलिस ठाण्यात दिली होती. त्यानुसार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. दोन महिने होऊनही त्याचा शोध लागत नसल्याने त्यांनी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची भेट घेतली. कोकाटे यांनी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे विशेष पथक तयार केले व तपास सुरू केला. मोबाइलच्या लोकेशनवरून तो जम्मू काश्मीर येथे असल्याचे समजले. त्यानुसार एक पथक तिथे रवाना केले. तेथील स्थानिक पोलिसांच्या मदतीने संबंधित मुलाला ताब्यात घेण्यात आले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यास नांदेड येथे आणले व नातेवाइकांच्या स्वाधीन केले. पोलिस उपनिरीक्षक प्रियंका आघाव, सहायक फौजदार सुधीर खोडवे, जमादार अच्युत मोरे, सायलू बिरमवार, गणेश जाधव, यशोदा केंद्रे व राजेंद्र शिटीकर आदींचा या पथकात समावेश होता.